# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भारताची युवाशक्ती लवकरच विकसित राष्ट्र निर्माण करेल – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला विश्वास
- उपग्रह जोडण्यापूर्वी स्थिर करण्यात इस्त्रोला यश
- एस.टी.च्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त बसगाड्या दाखल होणार

आणि

- भारतीय महिला क्रिकेट संघाचं आयर्लंडला ३७१ धावांचं मोठं लक्ष्य

****

भारताची युवाशक्ती लवकरच विकसित राष्ट्र निर्माण करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात युवा नेत्यांशी संवाद साधताना ते आज बोलत होते. स्वामी विवेकानंदांचा सर्वात जास्त विश्वास युवकांवर होता. प्रत्येक समस्येवर युवक उत्तर शोधतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यावर आपलाही ठाम विश्वास असल्याचं मोदी यांनी सांगितलं. देश अनेक क्षेत्रात आपलं लक्ष्य निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण करत असल्याचं त्यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

> ***भारत ने हर परिवार को बँक अकाऊंटसे जोडने का लक्ष्य रखा। आज भारत का करीब करीब हर परिवार बँकिंग सेवा से जुड चुका है। भारत ने गरीब महिलाओं की रसोई को धुयें से मुक्त करने का संकल्प लिया। हमनें दस करोड से अधिक गॅस कनेक्शन देकर इस संकल्प को भी***

***सिद्ध किया। आज कितने ही सेक्टर्स मे भारत अपने लक्ष्यों को तय समय से भी पहले हासिल करके दिखा रहा है।***

****

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला स्पेडेक्स उपक्रमाअंतर्गत डॉकिंग म्हणजेच उपग्रह जोडणीपूर्वी दोन उपग्रहांना स्थिर करण्यात यश आलं आहे. संस्थेतर्फे या संदर्भातली माहिती देण्यात आली आहे. इस्रोने चेसर आणि टार्गेट उपग्रह एकमेंकापासून तीन मीटर अंतरापर्यंत आणण्याचा प्रयत्न यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या प्रयोगादरम्यान मिळालेल्या माहितीचं विश्लेषण केल्यानंतर डॉकिंग प्रक्रिया केली जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे. डॉकिंगनंतर, दोन्ही उपग्रह एकाच अंतराळयानाच्या स्वरूपात नियंत्रित केले जातील. डॉकिंग यशस्वी झाले आहे की नाही हे तपासण्यासाठी एका उपग्रहातून दुसऱ्या उपग्रहात वीज हस्तांतरित केली जाईल. यानंतर, दोन्ही उपग्रह स्वतंत्रपणे कार्य करण्यासाठी अनडॉक केले जातील. अमेरिका, रशिया आणि चीननंतर ही कामगिरी करणारा भारत हा चौथा देश असेल.

****

राज्य परिवहन महामंडळ–एस.टी.च्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होत असून याद्वारे राज्याच्या प्रत्येक रस्त्यावर नवी लालपरी धावताना दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे. ते आज ठाणे इथं राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी १७ नव्या गाड्यांचं लोकार्पणही झालं. स्वच्छतेसह सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत एकूणच परिवहन सेवेचं चित्र बदलण्याचा आराखडा बनवला जात असून टप्प्याटप्प्यानं एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल असं सरनाईक म्हणाले. याचा पहिला लाभ एसटी कर्मचाऱ्यांना, त्यांच्या गणवेशापासून – विश्रामगृह आणि स्वच्छतागृहापर्यंत मिळणाऱ्या प्रत्येक सुविधांचा दर्जा उंचावून होईल असं सांगून त्याद्वारे एसटी कर्मचारी प्रवाशांना चांगल्या सुविधा देऊ शकतील असं ते म्हणाले.

****

छत्तीसगडमध्ये आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. बिजापूर जिल्ह्यातल्या राष्ट्रीय उद्यानात माओवाद्यांनी आश्रय घेतल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून मिळाल्यावर सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकांनं शोध मोहीम राबवली. या अभियानात मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा हस्तगत करण्यात आला

असून यात स्वयंचलित शस्त्रास्त्रांचाही समावेश आहे. या विभागात शोध अभियान अजूनही सुरु असल्याची माहिती तपास यंत्रणांतर्फे देण्यात आली.

****

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांना आदरांजली वाहिली.

****

छत्रपती शिवाजी महारराजांच्या मातोश्री–राष्ट्रमाता जिजाऊ यांची ४७२वी जयंती आणि स्वामी विवेकानंद यांची १६३ वी जयंती राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेतर्फे आज उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रम सरगर यांच्या हस्ते तर, महानगरपालिकेत महानगर पालिका उपायुक्त अशोक गिरी यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी सार्वजनिक जयंती महोत्सव समीतीच्या वतीनं आज अभिवादन फेरी काढण्यात आली. शहरातील क्रांती चौकात राजमाता जिजाऊ यांची भव्य प्रतिमा साकारण्यात आली आहे.

परभणीच्या जिजाऊ मंदीर इथं काल जिजाऊ जन्मोत्सवच्या पुर्वसंध्येला दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शेकडो दिव्यांच्या प्रकाशानं जिजाऊ मंदिर उजळून निघालं होतं. परभणी शहरात राजमाता जिजाऊंच्या जन्मोत्सवा निमित्त त्यांच्या जीवनचरित्राचं सामुहिक वाचन, सामुहिक महाआरती करण्यात आली. शहरामधील जिजाऊ मंदिरात जिजाऊ ब्रिगेडतर्फे काल जन्मोत्सवच्या पूर्वसंध्येला दीपोत्सव साजरा करण्यात आला.

बीड शहरात आज जिजाऊंच्या पुतळ्यास अभिवादनासाठी नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

जालना शहरात राजमाता जिजाऊ यांची जयंती सर्वपक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत निघालेल्या दुचाकी फेरीमध्ये आमदार अर्जुन खोतकर, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यासह महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला. राजमाता

जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जालना शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणीही अभिवादन कार्यक्रम झाले.

****

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयातर्फे स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ जयंती – राष्ट्रीय युवा दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं आज उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम झाला. देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे या अंतर्गत गेल्या नऊ तारखेपासून विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. संस्थेच्या उद्योजक होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. उद्योजक उमेश दाशरथी, महापारेषणचे अधिक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण, संस्था व्यवस्थापन समितीचे दुष्यंत आठवले, डॉ. निखिल आठवले यावेळी प्रमुख उपस्थित होते. संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशिष गर्दे यांच्या हस्ते उपक्रमाचं उद्‌घाटन करण्यात आलं.

****

शिर्डी इथं भारतीय जनता पक्षाच्या महाविजय अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मार्गदर्शन केलं. या अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, पक्षाचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, छत्रपती उदयनराजे भोसले, विनोद तावडे प्रमुख उपस्थित होते. २०२५ च्या महाविजयाची सुरुवात दिल्ली विधानसभा निवडणुकीद्वारे होणार असल्याचा विश्वास शाह यांनी यावेळी व्यक्त केला. विकसित महाराष्ट्राशिवाय विकसित भारत होऊ शकत नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी आपल्या भाषणामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीत दिलेलं प्रत्येक आश्वासन आपण पूर्ण करणार असल्याचं सांगितलं.

****

भारत–आयर्लंड महिला संघांदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज राजकोट इथं सुरू आहे. नाणेफेक जिंकून भारतानं प्रथम फलंदाजी स्वीकारताना पाहुण्या संघासमोर ३७१ धावांचं अशक्यप्राय आव्हान ठेवलं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा आयर्लंड संघानं ४० षटकांनंतर चार बाद १८४ धावा केल्या होत्या. भारतानं या मालिकेतला पहिला सामना जिंकला आहे.

****

चालकानं प्रसंगावधान राखल्यानं अंबाजोगाई तालुक्यात बस अपघाताचा अनर्थ आज टळला. तालुक्यातल्या पठाण मांडवा घाटात प्रवाशी घेऊन जाणाऱ्या बसचे ब्रेक निकामी झाले. बस चालक पारजी उबाळे यांनी यावेळी प्रसंगावधान दाखवत बस घाटाच्या कठड्यावर आदळवली, बस घाटातल्या झाडांना अडकल्यानं अपघात टळला. दोन दिवसांपूर्वी चालकानं बसचे ब्रेक लागत नाही असं सांगितलं होतं. त्यानुसार ब्रेकचे काम करून दिलं होतं. परंतु ब्रेक ऑईलचा पाईप फुटला असावा आणि त्यामुळं ब्रेक निकामी झाले असावे, अशी माहिती अंबाजोगाई आगार प्रमुख अमर राऊत यांनी आकाशवाणीच्या वार्ताहराला दिली.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज तीर्थ इथं उद्यापासून महाकुंभ मेळा सुरू होत असून उद्याच्या पौष पौर्णिमेच्या पुण्यकाळात पहिलं शाही स्नान होणार आहे. यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांना या पर्व काळात शुद्ध हवेचा पुरवठा व्हावा यासाठी विशेष जंगल क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत. गेल्या दोन वर्षात प्रयागराज शहरात १० ठिकाणी ५५ हजार चौरस मीटरवर ६३ प्रकारची १ लाख २० हजार झाडं लावून हे जंगल विकसित करण्यात आलं आहे.

****

अमरावती नजीकच्या नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरात कार्यरत असलेल्या गोल्डन फायबर कंपनीमध्ये मध्ये काम करणाऱ्या तब्बल १००हून अधिक महिलांना आज विषबाधा झाल्यानंतर उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. कंपनीमध्ये पाणी पिल्यानंतर या महिलांना मळमळ आणी डोकेदुखीचा त्रास सुरु झाला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी या महिलांना रुग्णालयात दाखल करण्यात सहकार्य केलं.

****